# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय : ०७१२–२५२२९९१, फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्रमांक : रातुमनावि/साप्र/स/२४८८

दिनांक : १५ फेब्रुवारी २०१७

## परिपत्रक

सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, राज्य निवडणुक आयोगाने जाहिर केलेल्या निवडणुक कार्यक्रमांनुसार राज्यातील १५ जिल्हापरिषदांकरिता त्यांच्या कार्यक्षेत्रात व त्याअंतर्गत १६५ पंचायत समित्यांच्या क्षेत्रामध्ये, सार्वत्रिक निवडणूकांचे मतदान दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ रोजी होणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ८ फेब्रुवारी २०१७ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचना क्र.सार्वसु–१११७/७५/प्र.क्र.२३/२९ अन्वये गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ रोजी सार्वत्रिक मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. राज्यातील १५ जिल्हा परिषदा व १६५ पंचायत समित्यांच्या क्षेत्रामध्ये वर्धा जिल्हा परिषद समाविष्ट आहे. त्यानुसार शासन आदेशान्वये विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या वर्धा जिल्हातील महाविद्यालयांना जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या क्षेत्रातील सार्वजनिक निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्यात येत आहे.

मा. कुलगुरूंचे आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

**प्रतिलिपी:**

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयाचे सर्व प्राचार्य व संचालक
३. विद्यापीठाचे सर्व अधिकारी

(प्रदिप मसराम)
उपकुलसचिव (सा.प्र.)
अतिरिक्त प्रभार